**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram : Edutech E-Mail : director@dte.org.in Website: http://www.dte.org.in

क्रमांक :- १०/एडीजी/२००९/१५८
दिनांक २९/५/२००९

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने.

विषयः- दिनांक १८/३/२००९ रोजी मा.प्रधान सचिव यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये ठरलेल्या विषयाचा कार्यवाही अहवाल.
संदर्भः- या कार्यालयाचे कार्यालयीनय आदेश क्र.११/तंशिसं/बैठक/२००९/६ दिनांक १/४/२००९

दिनांक १८/३/२००९ रोजी मा.प्रधानसचिव यांच्या सोबत बैठक आयोजित करण्यांत आली होती. त्यामध्ये झालेल्या निर्णयानुसार खालील बाबतीमध्ये आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक ६/६/२००९ रोजी होणाऱ्या बैठकीच्या वेळी सोबत घेऊन यावा.

१. सर्व तंत्र निकेतनांनी एनबीए साठी एप्रिल २००९ अखेर प्रस्ताव पाठवावा.
२. सर्व शासकीय तंत्रनिकेतनांनी शैक्षणिक स्वायत्ततेसाठी प्रस्ताव तयार करावा.
३. सर्व तंत्रनिकेतनामध्ये संगणकीकरण करण्यात यावे.
४. सर्व तंत्रनिकेतनामधून संस्था उद्योगधंदे समन्वयाबाबत धोरण ठरवून त्यानुसार ॲक्शन प्लॅन तयार करण्यात यावा.
५. प्रत्येक तंत्रनिकेतनामधून संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा व इतर माहिती याबाबतचा डेटाबेस तयार करावा व वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावा. तसेच संस्थेमध्ये दर्शनी भागावर लावण्यात यावा.
६. सर्व संस्थांमधून ॲल्युमिनी असोसिएशन करण्यात यावे व त्याद्वारे विविध उपक्रम राबविण्यात यावे.

७. सर्व कार्यालयामधून रचना व कार्यपध्दती याचा उपयोग करुन कार्यालयाचे कामकाज करण्यात यावे.

८. नादुरुस्त व बंद पडलेली उपकरणे व मशीनरी निर्लेखित करुन त्याची विल्हेवाट लावण्यात यावी.

९. सन २००९-२०१० सालासाठी तंत्र शिक्षण खात्याला ६०० कोटीच्या वर निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे यासाठी संस्थेसाठी आवश्यक उपकरणे, मशीनरी, नवीन इमारती, इमारत दुरुस्ती, ग्रंथालय, विकास याबाबतचे प्रस्ताव दिनांक १०/४/२००९ पर्यंत संचालनालयास सादर करण्यात यावे.

१०. शासकीय तंत्रनिकेतना मधून शाखा निवडण्यात याव्या व त्या शाखा उत्कृष्ठ व आदर्श शाखा बनविण्यात याव्या.

११. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेसाठी प्रत्येक शाखेमधून कमीतकमी एक असे सर्व संस्थांनी मॉडरॉब व इतर अनुदानासाठी त्यांचे वेळापत्रकानुसार प्रस्ताव सादर करावे.

( दयानंद मेश्राम )
प्र.संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई